शासन अनुदानित खाजगी आयुर्वेद ... महाविद्यालयातील अध्यापकीय संवर्गातील पदे निवड मंडळामार्फत भरणे व त्यासाठी शासनस्तरीय निवड मंडळाची स्थापना करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन आदेश क्रमांक: एडीआर-२०१७/प्र.क्र.०५/१७/आयु-२,
गो.ते. रुग्णालय आवार, गो.ते.संकुल, ९ वा माळा, मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक :- २८ ऑगस्ट, २०१७

**प्रस्तावना :-**

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिनस्त असलेल्या महाराष्ट्र राज्यातील शासन अनुदानीत खाजगी आयुर्वेद व युनानी महाविद्यालयातील शासनमान्य अध्यापकीय पदांची भरती प्रक्रिया संबंधित संस्थांकडून राबविण्यात येते. सदर भरती प्रक्रियेस संस्थास्तरावर बराच कालावधी लागत असल्याने दीर्घ कालावधीसाठी संबंधीत महाविद्यालयातील पदे रिक्त राहतात. या वैद्यकीय महाविद्यालयांमधील अध्यापकीय पदे ही विहीत कालावधीत भरली न गेल्यास संबंधीत महाविद्यालयांच्या प्रवेश मान्यतेवर तथा अध्यापन प्रक्रियेवर त्याचा विपरित परिणाम होतो. परिणामी अशा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रियासुध्दा विहीत मुदतीत पूर्ण होण्यास अडचणी निर्माण होतात. तसेच अध्यापकांची पदे रिक्त राहिलेमुळे संबंधीत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित जोपासले जात नाही. त्याचप्रमाणे संबंधीत महाविद्यालयाशी संलग्न असलेल्या रुग्णालयातील रुग्णांना दर्जेदार वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्यास अडचणी येतात. त्याशिवाय भारतीय चिकित्सा केंद्रिय परिषद व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांच्याकडून होणाऱ्या तांत्रिक निरीक्षणाच्या समयी अध्यापकांच्या रिक्त पदांमुळे संबंधीत महाविद्यालयांच्या मान्यतेवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. संस्थास्तरावर केल्या जाणाऱ्या अध्यापकीय पदांच्या भरती प्रक्रिये संदर्भात शासनाकडे तथा आयुष संचालनालयाकडे मोठया प्रमाणावर वारंवार तक्रारी प्राप्त होत असतात. या सर्व बाबींचा विचार करुन सदर भरती प्रक्रिया विहीत मुदतीत तथा पारदर्शीपणे होण्यासाठी उक्त महाविद्यालयांमधील अध्यापकांची रिक्त पदे संबंधीत संस्थेऐवजी शासनाद्वारे गठीत निवड मंडळामार्फत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र राज्यातील आयुष संचालनालयांतर्गत असलेल्या शासन अनुदानीत खाजगी आयुर्वेद व युनानी महाविद्यालयातील अध्यापकीय संवर्गातील रिक्त पदांची भरती प्रक्रिया सदर आदेश पारित झाल्याच्या दिनांकापासून शासनस्तरावर गठीत करण्यात आलेल्या निवड मंडळाद्वारे करण्यात येईल. उक्त प्रयोजनासाठी पुढीलप्रमाणे शासनस्तरीय निवड मंडळाची स्थापना करण्यास सुद्धा या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.



निवडनस्ती

| | | | |
|---|---|---|---|
| | अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | : | अध्यक्ष |
| २ | संचालक, आयुष संचालनालय | : | सदस्य |
| ३ | महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे सेवानिवृत्त कुलगुरु | : | सदस्य |
| ४ | सामान्य प्रशासन विभागातील सह सचिव दर्जापेक्षा कमी नसलेले प्रतिनिधी | : | सदस्य |
| ५ | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील सह सचिव दर्जापेक्षा कमी नसलेले प्रतिनिधी | : | सदस्य |
| ६ | विभागातील संबंधित सह/उप सचिव | : | सदस्य सचिव |
| ७ | संबंधित क्षेत्रातील तज्ञ | : | निमंत्रित सदस्य |

२. अध्यापकीय संवर्गातील पदांसाठी उमेदवारांची निवड करण्याकरिता निकष निश्चित करण्याबाबत तसेच वरील निवड मंडळाची कार्यकक्षा व अधिकार याबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने.

( सा.अ.पठाण )
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.मंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव.
४) मा.राज्यमंत्री, (वै.शि.) यांचे खाजगी सचिव
५) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.
६) मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांचे स्वीय सहाय्यक.
७) मा.सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांचे स्वीय सहाय्यक.
८) मा.सचिव, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग यांचे स्वीय सहाय्यक.
९) संचालक, आयुष संचालनालय, मुंबई
१०) महालेखापाल-१/२, (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
११) महालेखापाल-१/२, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
१२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१३) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागातील सह सचिव/ सर्व उप सचिव/अवर सचिव/ कक्ष अधिकारी.
१४) निवड नस्ती, आयु-२

शासन अनुदानित खाजगी आयुर्वेद व युनानी महाविद्यालयातील अध्यापकीय संवर्गातील सरळसेवेच्या रिक्त पदांची शासनस्तरीय निवडमंडळाद्वारे भरती करण्यासंदर्भातील निकष निश्चित करुन सदर निवड मंडळाची कार्यकक्षा व अधिकार ठरविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांक: एडीआर-२०१७/प्र.क्र.०५/१७/आयु-२,
गो.ते. रुग्णालय आवार, गो.ते.संकुल, ९ वा माळा, मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक :- २२ जानेवारी, २०१८

वाचा : शासन आदेश क्रमांक: एडीआर-२०१७/प्र.क्र.०५/१७/आयु-२ दिनांक २८ ऑगस्ट,२०१७

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्यातील शासन अनुदानीत खाजगी आयुर्वेद व युनानी महाविद्यालयातील अध्यापकीय संवर्गातील सरळसेवेची पदे भरण्यासाठी उपरोक्त संदर्भित दिनांक २८.०८.२०१७ च्या शासन आदेशान्वये शासनस्तरावर राज्यस्तरीय निवड मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. त्यानुसार सदर पदांवर उमेदवारांची निवड करण्यासाठी निवड प्रक्रियेचे निकष निश्चित करण्याची तसेच सदर निवड मंडळाची कार्यकक्षा व अधिकार निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

**निवड प्रक्रियेचे निकष व कार्यपध्दती :-**

१. राज्यातील सर्व खाजगी शासन अनुदानित आयुर्वेद व युनानी महाविद्यालयातील शासनमान्य अध्यापकीय संवर्गातील सद्यस्थितीतील सरळसेवेच्या रिक्त पदांच्या अनुषंगाने तसेच संभाव्य येत्या एका वर्षात रिक्त होणाऱ्या पदांच्या अनुषंगाने संबंधित विषयनिहाय माहिती संचालक, आयुष यांचेद्वारा संकलीत करण्यात येईल. तद्नंतर प्रत्येक संवर्गाच्या अनुषंगाने बिंदू नामावलीनुसार प्रवर्गनिहाय तसेच समांतर आरक्षणनिहाय संपूर्ण अनुषंगिक माहिती शासनास सादर करण्यात येईल.

२. सदर पद भरतीसाठी उमेदवारांकडून आकारावयाचे शुल्क व कार्यप्रणाली जाहिरात प्रसिध्द करतेवेळी शासनाकडून निश्चित करण्यात येईल. सरळसेवेने भरावयाची उपलब्ध रिक्त पदांची संक्षिप्त जाहिरात निवड मंडळातर्फे राज्यस्तरीय वर्तमानपत्रात जाहिरातीद्वारे प्रसिध्द करण्यात येईल व सविस्तर जाहिरात ही वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या व आयुष संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल.

३. शासन स्तरीय निवड मंडळाद्वारे विहीत करण्यात येणाऱ्या दिनांकास आवश्यकता भासल्यास पात्र उमेदवारांची चाचणी परीक्षा घेण्यात येईल. चाचणी परिक्षेचे स्वरुप कशा प्रकारे असावे याचे संपूर्ण अधिकार संचालक, आयुष यांच्याकडे राहतील. सदर चाचणी परिक्षा ही संचालक, आयुष संचालनालय यांच्या मार्फत घेण्यात येईल. चाचणी परिक्षेद्वारे उमेदवारांना मिळालेल्या गुणांच्या अनुषंगाने गुणवत्ते प्रमाणे १:५ या प्रमाणानुसार मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या व आयुष संचालनालय यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

४. सदर चाचणी परिक्षा ही अध्यक्ष/संचालक, आयुष/ निवड मंडळ यांचेकडून प्राधिकृत केलेल्या एजन्सी कडून घेण्यात येईल. सदर चाचणी परीक्षेची संकल्पना जास्त प्रमाणात उमेदवार उपलब्ध झाल्यास यादीला संक्षिप्त (Short list) करणे करीता आहे. उमेदवारांना चाचणी परिक्षेत एकूण प्राप्त झालेल्या गुणांच्या ५० टक्के गुण, मुलाखतीनंतर अंतिम गुणामध्ये विचारार्थ घेण्यात येतील. चाचणी परिक्षेमध्ये उमेदवारांना प्राप्त झालेले गुण अंतिम निवडयादी प्रसिध्द होईपर्यंत जाहीर केले जाणार नाहीत.

५. ज्या रिक्त पदांसाठी मर्यादित अर्ज प्राप्त होतील अशा पदांसाठी चाचणी परिक्षा घेण्यात येणार नाही, त्या पदांबाबत शासन स्तरीय निवड मंडळाकडून उमेदवारांच्या मुलाखतीच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करुन, व विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन उमेदवारांची नियुक्ती करण्यात येईल.

६. शासनस्तरीय निवड मंडळाद्वारे सदर उमेदवारांच्या मुलाखती घेण्यासाठी सुनिश्चित दिनांक, वेळ व ठिकाण वैद्यकीय शिक्षण विभागाच्या व आयुष संचालनालय यांच्या

संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुसार संबंधित पात्र उमेदवारांनी मुलाखतीकरिता सुनिश्चित केलेल्या स्थळी, वेळेवर मुलाखतीच्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित राहावयाचे आहे.

०७. मुलाखतीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत मुलाखतीच्या इतिवृत्तासह मुलाखतीसाठी उपस्थित राहिलेल्या उमेदवारांची मुलाखतीमध्ये उमेदवार निहाय देण्यात आलेल्या गुणांची सीलबंद यादी शासनाकडून संचालक, आयुष यांचेकडे पाठविण्यात येईल.

०८. उमेदवार निहाय मुलाखतीचे गुण व चाचणी परीक्षेचे गुण आयुष संचालनालय, मुंबई यांचेद्वारा एकत्र करुन, त्यानुसार रिक्त पदांच्या अनुषंगाने संवर्गनिहाय व प्रवर्गनिहाय गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांची निवडसूची तसेच प्रतिक्षासूची संचालक, आयुष यांचेकडून अंतिम मान्यतेसाठी ती शासनस्तरीय निवडमंडळाकडे पाठविण्यात येईल. व शासनस्तरीय निवडमंडळाच्या अध्यक्षांची मान्यता मिळाल्यानंतर अंतिम निवडसूची व प्रतीक्षासूची वैद्यकीय शिक्षण विभागाच्या व आयुष संचालनालय यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल.

०९. अशाप्रकारे प्रसिध्द करण्यात आलेल्या अंतिम निवडसूचीचा व प्रतिक्षासूचीचा कालावधी हा निवड मंडळातर्फे अंतिम निवड सूची जाहीर झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षे किंवा पुढील निवड भरती प्रक्रिया यापैकी जे अगोदर असेल तो पर्यंत वैध राहील.

१०.अंतिम निवड सूची व प्रतीक्षा सूची प्रसिध्द केल्यानंतर आयुष संचालनालय, मुंबई यांचेद्वारा पंधरा दिवसांचे आत उमेदवारांचे समुपदेशन (Counseling) घेण्यात येऊन व संबंधित शासन अनुदानित संस्थांसाठी उमेदवारांनी दिलेल्या पसंतीक्रमानुसार त्यांना प्राप्त गुणांच्या अनुषंगाने महाविद्यालयनिहाय अंतिम निवड सूची संचालक, आयुष यांचेकडून शासन स्तरीय निवड मंडळाकडे शिफारसीकरिता पाठविण्यात येईल.

११. अंतिम निवड सूचीतील उमेदवारांना नियुक्तीकरीता निवड मंडळाकडून शिफारस पत्र देण्यात येईल. निवड मंडळाची शिफारस प्राप्त झाल्यानंतर दहा दिवसांचे आत

निवड झालेल्या उमेदवारांना संबधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडून नियुक्तीपत्रे देण्यात येतील.

१२. अंतिम निवड सूचीतील उमेदवारांना समान गुण असतील तर अशा उमेदवारांचा गुणवत्ता क्रम अनुक्रमे खालील निकषांनुसार निश्चित करण्यात येईल.

1. रिक्त पदांच्या संदर्भात उमेदवारांचे पदवी परीक्षेतील त्याच विषयामध्ये प्राप्त उच्चतम गुण. तद्नंतर,
2. उमेदवारांचे पदवी परीक्षेमधील ३ वर्षाचे (Aggregate) एकूण गुणांची टक्केवारी. तद्नंतर,
3. वय (वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवारांचा ज्येष्ठता क्रम वरती लागेल.)

१३.अशाप्रकारे निवड मंडळाकडून शिफारसपत्र देण्यात आल्याच्या दिनांकापासून, उमेदवारांना शासन अनुदानित संबंधित खाजगी आयुर्वेद/युनानी महाविद्यालयातील संबंधित रिक्त पदांवर (३०) दिवसांचे आत रुजू करुन घेणे व (३५) दिवसांचे आत त्याबाबतचा रुजू अहवाल संचालक, आयुष यांचेकडे सादर करण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या (नियुक्ती प्राधिकारी) प्राचार्य यांची राहील.

१४.निवड सूचीनुसार नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांने (३०) दिवसांचे आत नियुक्तीच्या पदावर रुजू होणे आवश्यक राहील. सदरची अट शिथिल करण्याचे अधिकार अध्यक्ष, निवड मंडळ यांना राहतील. अंतीम निवड सूचीनुसार नियुक्ती देण्यात आलेला उमेदवार त्याला नियुक्ती पत्र दिल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांचे आंत नियुक्तीच्या पदावर रुजू न झाल्यास, संबधित उमेदवाराची निवड आपोआप रद्द होऊन प्रतिक्षासूचीतील गुणानुक्रमे पात्र उमेदवाराची त्याच्याऐवजी निवड करण्यात येईल.

१५. चाचणी परिक्षेचे स्वरुप, मुलाखतीचे स्वरुप तसेच समुपदेशन (Counseling) बाबतचे स्वरुप याबाबतची माहिती वेळोवेळी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग तसेच संचालक, आयुष, मुंबई यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

१६. सदर पद भरती प्रक्रियेपूर्वी रिक्त असलेली व आगामी एक वर्षाच्या कालावधीत रिक्त होणारी अध्यापकीय संवर्गातील सरळसेवेची पदे संबंधित अनुदानित

महाविद्यालयांनी संचालक, आयुष यांचेकडे सादर केलेल्या माहितीनुसार वरीलप्रमाणे नमूद कार्यपध्दतीचा अवलंब करुन भरण्यात येतील.

१७. जाहिरातीच्या अनुषंगाने उमेदवाराने केलेल्या अर्जात कोणतीही खोटी/चुकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती नमूद केली असल्याचे निदर्शनास आल्यावर संबंधित उमेदवारास कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरवून, त्याबाबत कोणतीही पूर्व सुचना न देता निवड रद्द करण्याचे अधिकार निवड मंडळाकडे राहतील.

१८. शासन स्तरीय निवड मंडळाद्वारे भरती प्रक्रिया व निवडी संदर्भात सुनावणी घेण्याचे अधिकार वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे प्रशासकीय प्रमुख मा.अप्पर मुख्य सचिव/मा.प्रधान सचिव/मा.सचिव यांजकडे राहतील. तसेच त्यानुसार याविषयीचे अपीलाबाबत कार्यवाही करण्याचे अधिकार मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचेकडे राहतील.

<u>शासनस्तरीय निवडमंडळाची कार्यकक्षा व अधिकार:-</u>

१) राज्यातील सर्व शासन अनुदानित खाजगी आयुर्वेद व युनानी महाविद्यालयातील अध्यापकीय संवर्गातील सरळसेवेने भरावयाची सर्व पदे सदर निवड मंडळाच्या कार्यकक्षेत असतील.

२) निवड प्रक्रियेअंतर्गत मुलाखत प्रक्रिया वगळता जाहिरात प्रसिध्द करण्यापासून ते अंतिम निवडसूची व प्रतिक्षासूची प्रसिध्द करण्याच्या कार्यवाहीसाठीचा संपूर्ण खर्च उमेदवारांकडून अर्जासोबत प्राप्त होणाऱ्या शुल्कातून संबधितास भागविता येईल.

३) सदर भरती प्रक्रियेसाठी संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणे, आवश्यकतेनुसार जाहिरातीत नमूद रिक्त पदांच्या संख्येत बदल करणे, अपरिहार्य कारणास्तव जाहिरात रद्द करणे, फेरजाहिरात प्रसिध्द करणे इ. अनुषंगिक अधिकार शासनस्तरीय निवडमंडळास असतील.

४) शासनस्तरीय निवड मंडळाचा संबंधित भरती प्रक्रियेतील निर्णय अंतीम राहील.

५) राज्यातील सर्व खाजगी अनुदानित आयुर्वेद व युनानी महाविद्यालयातील अध्यापकीय संवर्गातील सरळसेवेने भरावयाची पदे कोणत्याही परिस्थितीत यापुढे संस्थेद्वारा अथवा संबंधित महाविद्यालयांद्वारा भरता येणार नाहीत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१८०१२२१८३४३५३७१३ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने.

(साजीदखान.अ.पठाण)
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,राज्यपाल सचिवालय, राजभवन,मलबार हिल, मुंबई.
२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
३) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
४) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधान भवन, मुंबई.
६) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा, विधान भवन, मुंबई.
७) मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
८) मा.राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
१०) मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांचे स्वीय सहाय्यक.
११) मा.सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांचे स्वीय सहाय्यक.
१२) मा.सचिव, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग यांचे स्वीय सहाय्यक.
१३) संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.
१४) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागातील सह सचिव/ सर्व उप सचिव/अवर सचिव/ कक्ष अधिकारी.
१५) निवड नस्ती, आयु-२.

## DIRECTION NO. 02/2018 : CONSTITUTION OF SELECTION COMMITTEE FOR THE APPOINTMENT OF TEACHERS IN THE AFFILIATED PRIVATE GOVERNMENT AIDED AYURVEDA AND UNANI COLLEGES.

---

**WHEREAS,** the State Government has issued directives to the University under sub-section (ww) of section 5 of the Maharashtra University of Health Sciences Act, 1998 (herein after referred as the said Act) to issue direction in view of Government Resolution No. ADR-2017/Pra.kra.05/17/Ayu-2, dated 28/08/2017 for constitution of selection committee for the appointment of teachers in the affiliated private Government aided Ayurveda and Unani colleges by exercising powers vested with the Vice-Chancellor under sub-section (7) of section 16 of the said Act;

**NOW, THEREFORE,** I, Prof. Dr. Deelip G. Mhaisekar, the Vice-Chancellor of the Maharashtra University of Health Sciences in exercise of the powers conferred upon me under sub-section (8) of section 16 of the said Act, issue the following Direction, namely:-

1. Short title, extent and commencement:-
   **(1)** This direction may be called "Constitution of selection committee for the appointment of teachers in the affiliated private Government aided Ayurveda and Unani colleges".
   **(2)** It shall come into force prospectively from the date of its issue.
   **(3)** It extends to all the affiliated private Government aided Ayurveda and Unani Colleges for the appointment on the Government sanctioned and aided posts.

2. The teaching posts in the private Government aided Ayurveda and Unani Colleges under the Directorate of Ayurveda, Maharashtra State, shall be filled in by the selection committee constituted by this direction from the date of its issuance.

3. The Selection Committee for the teaching posts in the private Government aided Ayurveda and Unani Colleges under the Directorate of Ayurveda, Maharashtra State, shall be as follows;

| | | |
|---|---|---|
| 1 | Additional Chief Secretary / Chief Secretary / Secretary Medical Education and Drugs Dept. | Chairperson |
| 2 | Director, Directorate of AYUSH | Member |
| 3 | Retd. Vice-Chancellor of Maharashtra University of Health Sciences | Member |
| 4 | Not below the rank of Joint Secretary of General Administration Department | Member |
| 5 | Not below the rank of Joint Secretary of Social justice and special assistance Department | Member |
| 6 | Joint / Deputy secretary of the Medical Education and Drugs Dept. | Member Secretary |
| 7 | Expert in the concerned field | Invitee member |

4. The criterions for selection on teaching posts, Jurisdiction and rights of the selection committee shall be as prescribed separately, by the State Government, from time to time.

**Place : Nashik**

**Date : 30/08/2018**

**Sd/-**
**(Prof. Dr. Deelip G. Mhaisekar)**
**Vice-Chancellor**

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY**
**BENCH AT AURANGABAD**

**WRIT PETITION NO. 9662 OF 2017**

Kisan Vidya Prasarak Sanstha,
Through its President and others .. **Petitioners**

**Versus**

The State of Maharashtra and others .. **Respondents**

Shri S. R. Barlinge, Advocate for the Petitioners.
Shri S. G. Karlekar, A.G.P. for Respondent No. 1.
Shri Anandsing Bayas, Advocate for Respondent No. 3.
Shri Alok M. Sharma, Advocate for Respondent No. 4.

**CORAM : S. V. GANGAPURWALA & SUNIL K. KOTWAL, JJ.**
**DATE : 18th June, 2018**

**PER COURT :**

1. Mr. Karlekar, learned Assistant Government Pleader seeks time.

2. On the last date the learned A.G.P., on instructions of the Assistant Director, AYUSH submitted that respondents are not going ahead with filling in the post of the petitioner's institution. The learned A.G.P. submits that he has been instructed to seek

::: Uploaded on - 21/06/2018
::: Downloaded on -

HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY



adjournment in the matter for filing additional affidavit. However Assistant Director is not in a position to continue the statement made earlier.

3. At the request of the learned A.G.P., stand over to 16th July, 2018.

4. Till then, the respondents shall not fill in the post of the petitioner's institution and the institutions on behalf of which the petition is filed.

**[SUNIL K. KOTWAL, J.]** **[S. V. GANGAPURWALA, J.]**

marathe